# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचेकार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोननं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट क्रमांक :- १२९ -२२ दिनांक :- ०७/०५/२०२२

## नायजेरीयन नागरीकाचा खुन करुन बांगलादेश बॉर्डरमार्गे भारत देशातुन पळुन जाण्याचे तयारीत असलेल्या ०६ नायजेरीयन आरोपींना महाराष्ट्र व मेघालय पोलीसांच्या संयुक्त कारवाईमुळे २४ तासाचे आत जेरबंद

दिनांक ०४/०५/२०२२ रोजी २०:०० वा वालीव पोलीस ठाण्याचे हद्दीत नायगाव पुर्व येथील एका बंद फ्लॅटचे मास्टर बेडरुमच्या टॉयलेटमध्ये एका ५० वर्षीय नायजेरीयन नागरीकाचा नग्न अवस्थेत मृतदेह मिळून आल्याने दिनांक ०५/०५/२०२२ रोजी ००.४६ वा वालीव पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यु रजिस्टर नंबर ६६/२०२२ सीआरपीसी १७४ अन्वये दाखल करण्यात आला होता.

अकस्मात मृत्युचे चौकशीत यातील मृतक यास काही नायजेरीयन नागरिकांनी दिनांक ०३/०५/२०२२ रोजी रात्री ०८.४५ वाचे सुमारास त्याचे राहते घरातून नालासोपारा पुर्व येथुन जबरदस्तीने काढून त्याला ठोश्याबुक्यांनी मारहाण करून चार चाकी वाहनात (टोयोटा कार) बसुवन नेल्याचे दिसुन आले. आजुबाजूचे साक्षीदारांचे जबाबात देखील ती हकिगत कथन करण्यात आली. नायगाव येथील मृतक मरण पावलेल्या फ्लॅट मध्ये राहणारे तीन नायजेरीयन लोक हे घर सोडून निघून गेल्याचे पोलीसांना समजल्याने पोलीसांचा संशय बळावला. दरम्यान मृतक याचे उत्तरीय तपासणी दरम्यान यातील मृतक यास कठोर आणि बोथट हत्याराने मारहाण झाल्याने त्यास शरीरातील विविध अवयवांना अंतर्गत जखमा होवून, तो मयत झाल्याचे वैद्यकीय अधिकारी यांनी अभिप्राय दिला होता.

यातील मृतक यास ६ नायजेरीयन नागरिकांनी त्याचे राहते घरातून घराबाहेर काढून त्यास ठोश्याबुक्यांने मारहाण करून जबरदस्तीने चारचाकी वाहनात बसवून त्याला पळवून नेवून नायगाव येथे नमुद फलॅट मध्ये त्यास कठोर आणि बोथट हत्याराने जबर मारहाण करून जिवेठार मारले व पोलीसांची दिशाभुल करण्यासाठी त्याचे अंगावरील सर्व कपडे काढुन नग्न अवस्थेत त्याला बाथरूम मध्ये ठेवून रूमचा दरवाजा बंद करून पळून गेल्याचे निष्पन्न झाल्याने अकस्मात मृत्युचे तपास अधिकारी सपोनि संतोष सांगवीकर यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन वालीव पोलीस ठाणे गुन्हा रजि.नं. ४८१/२०२२ भादविस कलम ३०२,३६४,३२३,१४३,१४७,१४९ प्रमाणे गुन्हा दिनांक ०५/०५/२०२२ रोजी २१.३७ वा नोंद करण्यात आला.

सदर गुन्हयातील आरोपीत हे बँगलोर येथे पळून गेल्याची गोपनिय माहिती प्राप्त झाल्याने पोलीस पार्टी बेंगलोर येथे आरोपींच्या मागावर रवाना झाली होती. परंतू त्यादरम्यान नायजेरीयन आरोपी हे बँगलोर येथून विमानाने गुवाहाटी येथे गेल्याचे समजले. दरम्यान सदरचे आरोपीत हवाई मार्गे देश सोडुन जावु नयेत याकरीता लुक आऊट सेलला त्यांची माहीती पुरवुन त्यांना भारत देश सोडुन पळुन जाण्यास प्रतिबंध करण्याकरीता रिपोर्ट देण्यात आला होता. आरोपी हे गुवाहाटी-चेरापुंजी - शिलॉग- डावकी मार्गे बांग्लादेश येथे पळून जाण्याचे तयारीत असल्याची माहीती मिळाल्याने आपले कडील मा. वरिष्ट पोलीस अधिकारी यांच्या मार्फतीने मेघालय येथील मा. वरिष्ठ पोलीस अधिका-यांशी संपर्क साधुन त्यांना आरोपींचे फोटो व उपलब्ध पासपोर्ट नंबर पुरविण्यात आले.तसेच मेघालय पोलीसांना सदरचे आरोपीत मिळुन आल्यास त्यांना आपल्या ताब्यात घेण्याची विनंती करण्यात आली होती.

महाराष्ट्र पोलीसांनी सदर गुन्हयातील फरार झालेल्या आरोपींचे फोटो व त्यांची पुरविलेली इंत्यभुत माहीती व त्यावरुन मेघालय पोलीसांनी उचललेली तातडीची पाऊले व केलेली कार्यवाही यामुळे सदर गुन्हयातील ०६ ही नायजेरीयन

Scanned with CamScanner

आरोपींना दिनांक ०६.०५.२०२२ रोजी सायंकाळी १७.०० वा मेघालय पोलीसांनी ताब्यात घेण्याची महत्वपुर्ण कामगिरी केलेली आहे.

अशा प्रकारे वालीव पोलीस ठाण्याचे हद्दीतील एका नायजेरीयन इसमाचा खुन करुन अटक टाळण्यासाठी बांगलादेश बॉर्डर मार्गे पळुन जाण्याच्या तयारीत असलेल्या ०६ नायजेरीयन आरोपींना महाराष्ट्र पोलीस व मेघालय पोलीस यांनी संयुक्तीकरित्या केलेल्या कारवाईमुळे २४ तासाचे आत जेरबंद करण्यात आलेले असुन नमुद आरोपींना पुढील कायदेशीर कारवाई करीता ताब्यात घेवुन वालीव पोलीस ठाण्यात आणणेकामी वालीव पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोलीस अधिकारी व अंमलदार शिलाँग राज्य मेघायलय येथे गेले आहेत.सदर पथकाने उक्त आरोपींना आज दिनांक ०७.०५.२०२२ रोजी ताब्यात घेवुन त्यांना शिलाँग येथील स्थानिक न्यायालयात हजर करुन त्यांची ०७ दिवस ट्रान्झीस्ट रिमांड घेवुन वसई येथे येण्यास निघालेले आहेत.

महाराष्ट्र पोलीसांकडुन पुरविलेल्या माहीतीची आधारे सदरची मोलाची कामगिरी मेघालय येथील १) श्री. शैलेंद्र बमानिया (भापोसे),पोलीस अधीक्षक वाहतुक शाखा,पुर्व खासी हील्स,शिलाँग २) श्री टी सी चाको, अपर पोलीस अधीक्षक,आयजीपी का व सु ऑफिस मेघालय, ३) श्री इवान बेनसन डिंगडोह , डी एस पी सीटी,ईस्ट काशी हिल्स,शिलाँग ४) श्री गिल्बट मार्शिलाँग, डी वाय एस पी ट्रफिक,रिभोई ५) एस.एच.ओ.सदर पोलीस ठाणे श्री सी एन रानी ६) एस एफ सी /१७२ बिपुल बोरो ७) अेबीसी /३५५ शालांड मलाई ८) अेबी-डीसी/३५२ स्कायबोर्लीन पेरीआँग हया अधिकारी/अंमलदारांनी केलेली असुन सदरची कारवाई मा. श्री सदानंद दाते, पोलीस आयुक्त मि.भा.व.वि., मा. श्री श्रीकांत पाठक, अपर पोलीस आयुक्त, श्री संजयकुमार पाटील, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-२ वसई, श्री पंकज सिरसाठ, सहा पो आयुक्त तुळींज विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री कैलास बर्वे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री राहुलकुमार पाटील, पोनिरी (गुन्हे), सपोनि संतोष सांगवीकर तसेच गुन्हे प्रकटीकरण पथकातील सपोनि ज्ञानेश फडतरे, पोहवा/०२००३ मनोज मोरे, पोहवा/०००३ मुकेश पवार, पोहवा/०५०२४ किरण म्हात्रे, पोना/०६११८ सचिन दोरकर, पोना/०७०९६ राजेंद्र फड, पोना/०८०१० गांगुर्डे, पोअं/१४०६८ गरीबे, पोअं/१४०१७ मुंडे, पोअं/१६०१२ खताळ व वालीव पोलीस ठाण्यातील इतर अधिकारी व अंमलदार यांनी केली आहे.

Scanned with CamScanner